यावल न्यूज दिनांक : १२ ऑगस्ट २०२६

व्हिडीओ कॉल करतात भिती दाखवून लुबाडणाऱ्या पासून रहा सावध : टिना पाटील

सांगवी बुद्धक येथे ज्योती विद्या मंदिर शाळेत सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन

यावल : सयाच्या व्हिडिओ कॉलवर आपण पोलिस अधिकारी आहोत असे सांगत भिती दाखवून डिजिटल अरेस्टच्या नावांने लुबाडण्याचा प्रकार सुरू आहे. अशा कोणत्याच प्रकारची डिजिटल अरेस्ट होत नाही, तेल्हा असे कॉल आल्यास स्थानिक पोलिसांना माहिती दाावी आणि आपली फसवणूक टाळावी असे प्रतिपादन सायबर तज्ज्ञ टिना पाटील यांनी केले रा सांगवी बुद्धक येथील ज्योती विद्या मंदिर शाळेत सायबर सुरक्षा जन जागृती कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना वोलत होत्या.

सांगवी बुद्धक ता. यावल येथे ज्योती विद्या मंदिर शाळेत कवयित्री बहिणावाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सायबर शिक्षा व सुरक्षा कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. सोमवारी हा कार्यक्रम पार पडला यात हॅकर मास्क च्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे प्रत्यक्षिक सायबर तज्ज्ञ टिना पाटील आणि दर्शना चौधरी सादर केले.

व्हिडिओ कॉलवर आपण पोलिस अधिकारी आहोत असे सांभिती दाखवून डिजिटल अरेस्टच्या नावाने लुबाडण्याचा प्रकार सुरू आहे. त्या पासून सुरक्षत राहण्यांचे आवाहन टिना पाटील यांनी केले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्याविषयी माहिती देताना केवळ व्याान ने देता ससाना आंचार कशा प्रकारे प्रत्यक्षात नागरिकांच्या सायबर हल्ल्यांनी फसव ले याची माहिती दिली. तसेच हॅकर मास्कच्या माध्यमातून सायबर गुन्हेगार कशाप्रकारे आकर्षक संदेश पाठवतात, बनावट लिंक फिशान कॉलच्या माध्यमातून फसवण्याचा प्रयत्न करतात, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

यावेळी ओटीपी, यूपीआय फिशिंग, क्यूआर कोड, केवायसीच्या माध्यमातून फसवणूक, सोशल मीडिया, फोटो मॉर्फिंग, बनावट अकाउंट, पासवर्ड चोरी आणि ऑनलाईन व्यबहारातील फसवणूक यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर.एस. भंगाळे हे होते तर प्रमुखपाहुणे उपमुख्याध्यापक चंदकांत फिरके हे होते तर कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रसेनजित बाविसकर यांनी मानले.

क्लिक करण्यापूर्वी विचार करा.

- या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सोशल नेटवर्क्वर अनेक वुप वर लिंक टाकलेल्या असतात त्या लिंक क्लिक करण्यापूर्वी विचार करावा.
- अनोळखी लिंक ओपन केल्या मोबाईल हॅक होऊ शकतो.
- ओटीपी हा कुणा सोबत शेअर करू नका.
- सायबर क्षेत्रात अनेक प्रकारे फसवणूक होऊ शकते मात्र, आपण कसे सुरक्षित रहावे याची माहिती व मार्गदर्शन प्रसवंगी करण्यात आले.